दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ८२ • Title - Code :- MAHMAR49513 • शुक्रवार दि.१५ डिसेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# सरकारी कर्मचाऱ्यांनी जुन्या पेन्शनसाठी पुकारलेला संप मागे

**नागपूर : जुन्या पेन्शन योजनेसंदर्भात अंतिम निर्णय अर्थसंकल्पीय अधिवेशनात घेतला जाईल, असा शब्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सभागृहात दिल्यानंतर सरकारी कर्मचाऱ्यांनी जुन्या पेन्शनसाठी पुकारलेला बेमुदत संप मागे घेण्याची घोषणा केली आहे. मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनानंतर पुढील अधिवेशनापर्यंत संप स्थगित करण्याचा संघटनेने निर्णय घेतला. त्यामुळे शासनाच्या विविध विभागांत होणारा संभाव्य परिणाम टळलेला आहे.जुनी पेन्शन लागू करण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून सरकारी कर्मचारी आंदोलन करीत आहे. मात्र, सरकारच्या भूमिकेमुळे किंबहुना मार्च २०२३ मध्ये मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाची पुर्तता न केल्याने शासकीय कर्मचारी संघटनांच्या समन्वय समितीने आजपासून बेमुदत संप पुकारला होता. सरकारी कर्मचारी, शिक्षक, परिचारिका संपात सहभागी झाले होते. परंतु मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत जुन्या पेन्शनच्या संदर्भाने निवेदन देऊन आश्वस्त केल्याने सरकारी कर्मचाऱ्यांनी जुन्या पेन्शनसाठी पुकारलेला संप मागे घेण्याची घोषणा केली.**

राज्यातील अधिकारी,कर्मचाऱ्यांना जुनी सेवा निवृत्ती वेतन योजना लागू करण्यासंदर्भात नेमलेल्या समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे. त्यावर अभ्यास करण्याचे निर्देश देण्यात आले असून मुख्य सचिवांमार्फत त्याबाबतचे मत शासनाला सादर करण्यात येईल. निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची आर्थिक व सामाजिक सुरक्षा जुन्या पेन्शन योजनेप्रमाणे योग्य प्रकारे राखली जाईल, या मूळ तत्वावर शासन ठाम आहे. शासनाला प्राप्त झालेला अहवाल व त्यावरील चर्चा आणि अंतिम निर्णय हा या तत्वाशी सुसंगत असेल. त्यामुळे या अहवालावर अंतिम निर्णय येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात घेण्यात येईल, अशी ग्वाही देतानाच अधिकारी कर्मचाऱ्यांनी संप मागे घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत निवेदनाद्वारे केले.जुनी पेन्शन योजना लागु करण्या संदर्भात यापूर्वी शासनाने नेमलेल्या सुबोधकुमार समितीचा अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे. त्यावर या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. अधिकारी,कर्मचारी संघटनेने ज्या मागण्या केल्या होत्या, त्यावर महत्वपूर्ण असे सकारात्मक निर्णय घेण्यात आले आहे.ही केंद्र सरकारची योजना आहे, ज्या अंतर्गत लाभार्थ्यांना आयुष्याच्या शेवटपर्यंत मासिक पेन्शन दिली जाते. या अंतर्गत, मासिक पेन्शनची रक्कम एखाद्या व्यक्तीने काढलेल्या शेवटच्या वेतनाच्या निम्मी असते. जुनी पेन्शन योजना म्हणजे काय हे थोडक्यात सांगायचं झालं तर ज्या अंतर्गत सरकार २००४ च्या आधी सरकारी नोकरीत असेलल्या कर्मचाऱ्यांना एक निश्चित निवृत्ती वेतन देत होतं, हे वेतन कर्मचाऱ्याचा निवृत्त होत असतानाचा पगार किती होता? त्यावर अवलंबून होतं. या योजनेनुसार निवृत्त झालेल्या व्यक्तीचा मृत्यू झाला तर त्या व्यक्तीच्या कुटुंबाला पेन्शन मिळत होती. मात्र या योजनेत बदल करण्यात करून १ एप्रिल २००४ पासून राष्ट्रीय पेन्शन योजना सुरू करण्यात आली.




# शिक्षणाची गुणवत्ता असणारे नारायणा स्कूल आता अधिकृत

## अखेर नारायणा शाळेला यु डायस नंबर प्राप्त

**बीड । विशाल वाघमारे**

बीड शहरातील एका फार मोठ्या शिक्षण संस्थेने शिक्षण क्षेत्रात फार मोठे पाऊल टाकले होते आणि एकंदरीतच या शिक्षण संस्थेला डायस नंबर नसल्यामुळे फार मोठा विरोध झाला होता यानंतर या संस्थेवर कारवाई करण्याचेही बोलले जात होते परंतु या सर्व नाट्यमय घडामोडीला आता ब्रेक लागला आहे आता नारायणा ई - टेक्नो स्कूलला यु-डायस नंबर प्राप्त झाला आहे.नारायणा शाळा गेली दोन वर्ष आपल्या शैक्षणिक गुणवत्तेची व समर्पणाची दृढता दर्शवत आहे. आणि आता त्यातच यु डायस नंबर प्राप्त करून शाळेने आपल्या शैक्षणिक कुशलतेचा नवीन अध्याय सुरू केला आहे. आत्ताच्या या स्पर्धेच्या युगामध्ये मुलांच्या सर्वांगीण शिक्षणाला खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. मुलांना फक्त एकाच क्षेत्रामध्ये अभ्यास करून भागत नाही, तर त्यांना सर्व बोर्डाचा अभ्यास करणे आवश्यक झाले आहे. कुठल्याही स्पर्धा परीक्षेमध्ये कोणत्याही एका बोर्डाच्या अभ्यासावर परीक्षा होत नाही. त्यामुळे नारायणा शाळेमध्ये सीबीएससी, आयसीएससी, स्टेट बोर्ड तसेच आयबी व आयजीएसइ या बोर्डाच्या अभ्यासाचा समावेश करण्यात आलेला आहे. शाळेचा




अभ्यासक्रम सीबीएससी बोर्डात असला तरी अभ्यासक्रम मात्र या पाचही बोर्डाचा मिळून तयार केलेला आहे. नारायणाचे उद्दिष्ट आहे की सर्वच मुलांनी या स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तुंग यश प्राप्त करून आपले व आपल्या देशाचे नाव जागतिक स्तरावर गाजवावे आणि या कार्यासाठी नारायणा कटिबद्ध असून प्रगतिशील विद्यार्थी बनविण्यात त्यांची वाटचाल एकंदरीत चालणार असेच येणाऱ्या काळात दिसेल.

# एसटी मध्ये डिजिटल प्रणालीद्वारे मिळणार तिकीट

## वाहकांसाठी अँड्रॉइड तिकीट इश्यू मशीन्स सेवेत दाखल



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

एसटीतून प्रवास करतांना प्रवाशांना आता तिकिटासाठी सुट्या पैशाची चिंता नसावी यासाठी एसटी महामंडळाने एक पाऊल पुढे टाकले आहे. डिजिटल प्रणालीद्वारे तिकीट खरेदी करता येईल अशा सर्व वाहकांसाठी अँड्रॉइड तिकीट इश्यू मशीन्स (एढखच्) नव्याने सेवेत दाखल केल्या आहेत. नव्या मशीनमुळे प्रवाशांना प्रवासादरम्यान रोख पैशांऐवजी युपीआय किंवा क्युआरकोड आदी डिजिटल पेमेंटचा वापर करत तिकीट काढता येणार आहे.मे.ईबीक्सकॅश मोबिलिटी सॉफ्टवेअर लिमिटेड यांच्या सहकार्याने राज्य परिवहन महामंडळात सर्व वाहकांसाठी नवीन अँड्रॉइड आधारीत डिजिटलची सुविधा असणारी तिकीट मशीन घेण्यात आल्या आहेत. सध्या रोखीने व्यवहार होण्याचे प्रमाण खूप कमी झाले आहे. डिजिटल व्यवहाराला चालना देणे, हे पंतप्रधानांचे स्वप्न आहे. त्यादृष्टिकोनातून, एसटी महामंडळाने एक पाऊल पुढे टाकत प्रवासादरम्यान प्रवाशांना बसमध्ये तिकीट काढण्यासाठी फोन पे, गुगल पे यासारख्या युपीआय पेमेंटसाठी वाहकाकडे असलेल्या अँड्रॉइड तिकीट मशीनवर असलेल्या क्यूआर कोडद्वारे प्रवाशांना तिकिटाचे मोजके पैसे डिजिटल स्वरूपात देणे शक्य आहे. अर्थात प्रवाशांना या सुविधेमुळे खिशात रोख पैसे नाहीत म्हणून एसटीने प्रवास करणे टाळणे तसेच सुट्ट्या पैशासाठी वाहकांसोबत होणारा विनाकारण वाद असे प्रश्न कायमचे मिटू शकते. युपीआय पेमेंटद्वारे किंवा क्युआर कोडच्या माध्यमातून एसटीच्या सर्व प्रकारच्या बससेवेमध्ये तिकीट विक्री सुरू केली असून जास्तीत जास्त प्रवाशांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन एसटी महामंडळातर्फे करण्यात आले आहे.



**मूल तालुक्यातील जुनासुर्ला येथील शेतकरी मुकरूजी पाटेवार यांच्या शेतशिवारात जवळपास १२ते१३ फुटाचा भला मोठा अजगर साप आढळून आला. ग्रामपंचायत सदस्य गणेश वासुदेव खोब्रागडे यांनी फोन करून मूल येथील सर्पमित्र उमेशसींह झीरे यांना याबाबत माहिती दिली माहिती मिळताच सर्पमित्र उमेशसींह झीरे व आदित्य दहिवले हे तातडीने पाटेवार यांचे शेतात जाऊन त्यांनी अजगराला सुरक्षित पकडले. या कामात ग्रामपंचायत सदस्य गणेश खोब्रागडे यांनी स्वत: उपस्थित राहून सहकार्य केले.. पकडलेल्या अजगर सापाला डोनी येथील जगंलात सोडण्यात आले त्यामुळे अजगराला व सोबतच ग्रामस्थांना भीतीपासून मुक्ती मिळाली आहे. ग्रामस्थांनी उमेश झिरे व आदित्य दहिवले यांचे अभिनंदन करीत आभार व्यक्त केले आहे.(रोहित कामडे मूल)**

# सेवानिवृत्त माध्यमिक शिक्षक पी.जे.टोंगे यांचा प्रामाणिकपणा

## नजर चुकीने बँक खात्यात जमा केलेले सत्तर हजार रुपये प्रा. देवेंद्र पुसदेकर यांना परत केले

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भद्रावतीच्या बगडेवाडी येथील सेवानिवृत्त माध्यमिक शिक्षक पी.जे.टोंगे यांच्या बँक खात्यात काल दि. १३ डिसेंबर रोज बुधवार रोजी सत्तर हजार रुपये जमा झाले.सदर रक्कम भद्रावती तालुक्यातील चोरा येथील स्व. मातोश्री यमुनाबाई शिंदे विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा. देवेंद्र पुसदेकर यांच्या नजर चुकीने ऑनलाईन बैंकींग करतांना सेवानिवृत्त माध्यमिक शिक्षक पी.जे.टोंगे यांच्या बँक खात्यात जमा झाली.



दि. १३ डिसेंबर रोजी प्रा. देवेंद्र पुसदेकर यांनी पी.जे.टोंगे यांच्याशी संपर्क साधला. टोंगे यांनी क्षणाचाही विलंब न लावता संपूर्ण रक्कम परत करण्याची तयारी दर्शविली दि. १४ डिसेंबर रोजी पी.जे.टोंगे यांनी प्रा. देवेंद्र पुसदेकर यांना सत्तर हजार रुपयाचा चेक दिला.पी.जे.टोंगे आणि प्रा. देवेंद्र पुसदेकर दोघेही बँकेत गेले. प्रा. देवेंद्र पुसदेकर यांच्या बँक खात्यात सत्तर हजार रुपयाचा चेक जमा करण्यात आला.पी.जे.टोंगे यांनी प्रामाणिकपणे रक्कम परत केल्याबद्दल प्रा. देवेंद्र पुसदेकर यांनी त्यांच्या प्रतिकृतज्ञता व्यक्त केली.

# वाघाच्या हल्यात गुराखी जखमी

**मूल । प्रतिनिधी**


तालुक्यातील बोरचांदली येथे वाघाने गुराख्यावर हल्ला करून जखमी केल्याची घटना गुरुवारी दुपारी चार वाजताच्या दरम्यान घडली.जखमी झालेल्या गुराख्याचे नाव महादेव राऊत वय ६० राहणार बोरचांदली असे आहे. उमा नदीच्या नवीन पुलाच्या परिसरात गुरे चारण्याकरिता नेला असता दबा धरून बसलेल्या वाघाने महादेव राऊत याच्यावर हल्ला करून कानाला आणी हाताला गंभीर जखमी केले आहे. जखमी झालेल्या महादेव राऊत यांचा प्राथमिक उपचार मूल उपजिल्हा रुग्णालयात करून चंद्रपूर जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आले आहे.



# आनंद निकेतन महाविद्यालयाचे शिक्षकेत्तर कर्मचारी पुन्हा संपावर

**वरोरा । प्रतिनिधी**

जुनी पेन्शन योजना सुरू करावी या मागणीसह अन्य मागण्यांना घेऊन महारोगी सेवा समिती वरोरा व्दारा संचालित आनंद निकेतन विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना. संलग्नीत विदर्भ अशासकीय महाविद्यालय शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना, जिल्हा चंद्रपूर - गडचिरोली. विदर्भ अशासकीय महाविद्यालय शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना, र.नं एन. जी पी. ४७१७. व महाराष्ट्र राज्य अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेत्त कर्मचारी महासंघ र.नं.एन. एस. के. / के. १५०८ सरकारी निमसरकारी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना या सर्व समन्वय समितीचा १४ डिसेंबर पासून राज्यव्यापी बेमुदत संपामध्ये महाराष्ट्र राज्य अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी




महासंघ पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. सदर माहिती पत्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मृणाल काळे यांच्याकडे सादर करण्यात आले. यामध्ये कार्यकारिणी संघटनेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे मुख्य लिपिक देवानंद अलोने, सचिव प्रयोगशाळा परिचय सचिन नक्षिणे, कोषाध्यक्ष महाविद्यालयाचे वरिष्ठ लिपिक कमलाकर डुकरे, उपाध्यक्ष हिना डी. पांडे, सहसचिव प्रफुल बी. थुटे, संघटक भुपेश व्ही साखरे, महिला प्रतिनिधी अर्चना चव्हाण, कार्यकारिणी सदस्य सुनील चिमुरकर महासंघ प्रतिनिधी म. रा, चेतन नागदेवते, संतोष गुंतीवार, मिलींद मेश्राम, सुमीम शिर्के, तुषार पारखी, मैनाबाई मगरे. उपस्थित होते.

## संपादकीय

# सायबर गुन्हेगारीचे आव्हान

राष्ट्रीय गुन्हा नोंद विभाग (एनसीआरबी) ने नुकतीच २०२२ सालातील देशभरातील गुन्हेगारीची आकडेवारी जाहीर केली. त्यातील सायबर गुन्हेगारीची आकडेवारी लक्षणीय असून, महाराष्ट्राची आणि मुंबईची चिंता वाढवणारी आहे.'एनसीआरबी'च्या आकडेवारीनुसार, देशात गुन्हेगारीमध्ये उत्तर प्रदेशचा पहिला क्रमांक लागतो, तर महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्रात तीन लाख ७४ हजार ३८ गुन्ह्यांची २०२२ मध्ये नोंद झाली आहे. त्यापाठोपाठ मध्यप्रदेश, राजस्थान, केरळ या राज्यांचा नंबर लागतो. 'एनसीआरबी'ची आकडेवारी बारकाईने पाहिली, तर आणखी एक धक्कादायक बाब म्हणजे प्रगत, सुशिक्षित समजला जाणारा महाराष्ट्र आत्महत्यांमध्ये अग्रस्थानी आहे. २०२२ या वर्षांत तब्बल २२ हजार ७४६ जणांनी आपले जीवन स्वतःच संपविले आहे. नापिकी, हवामानाच्या लहरीपणामुळे झालेल्या शेतीचे नुकसान, कर्जबाजारीपणा यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या या सर्वजण ऐकून आहात. मात्र, 'एनसीआरबी'ने जी आकडेवारी दिली आहे यामध्ये शेतकऱ्यांच्या ग्रामीण भागापेक्षा मुंबईसारख्या शहरी भागात आत्महत्यांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसते. देशातील १९ प्रमुख शहरांच्या यादीत मुंबईमध्ये २०२२ या वर्षांत १५०१ आत्महत्यांची नोंद झाली आहे. चिंताजनक म्हणण्यापेक्षा ही आकडेवारी अतिशय वेदनादायी आहे आणि दर वर्षी ही वेदना कमी होण्याऐवजी अधिकच वाढत असल्याचे दिसून येते. कौटुंबिक कलह, आजारपण, बेरोजगारी आणि नशा ही चार प्रमुख कारणांमुळे सर्वाधिक व्यक्तींनी आपले आयुष्य संपवले आहे. आत्महत्या रोखण्यासाठी मानसिक, कौटुंबिक आणि सामाजिक आरोग्य सुधारण्याची गरज आहे. घराघरात, प्रत्येकाच्या मनात काय चाललंय याची कल्पना पोलिसांना नसते, मात्र तरीही पोलिसांनी अनेकांना आत्महत्या करताना वाचविल्याची, त्यांना आत्महत्येपासून परावृत्त केल्याची उदाहरणे आहेत.प्रगत, पुढारलेले, शिक्षित आणि रोजगार पुरवणारं राज्य म्हणून महाराष्ट्राची देशात ओळख आहे. म्हणूनच देशभरातील नागरिक आज राज्याच्या कानाकोपऱ्यात राबताना दिसतात. मुंबई देशाची आर्थिक राजधानी आहे. कुणालाही उपाशी ठेवत नाही, अशी मुंबईची ख्याती आहे. रोजगारासाठी, आकर्षणापोटी; तसेच इतर अनेक कारणांसाठी देशाच्या सर्वच भागातून लोंढेच्या लोंढे मुंबई आणि महाराष्ट्रात येत असतात. पोटापाण्यासाठी हाताला मिळेल ते काम हे बेरोजगार करीत असतात; परंतु आता मुंबईची रोजगार देण्याची क्षमता संपलेली आहे. हाताला काम न मिळाल्याने उपासमार होते. पैसे नसल्याने शहरात राहणे परवडत नाही आणि गावाकडे पुन्हा परतायचेही नसते. त्यामुळे अशा लोकांची पावले गुन्हेगारी क्षेत्राकडे वळतात. झटपट श्रीमंत होण्यासाठी चोरीच्या गुन्ह्यापासून सुरु झालेल्या प्रवास दरोडा, हत्या अशा गंभीर गुन्ह्यांपर्यंत कधी जाऊन पोहोचतो हे कळतही नाही. एक गुन्हा पचला की दुसरा आणि सोबत साथीदारांनाही घेतले जाते. यामुळे गुन्हेगार आणि गुन्हेगारीचा आलेख झपाट्याने वाढतो. राज्याच्या विशेषकरून राज्यातील प्रमुख शहरांच्या लोकसंख्येवर नियंत्रण मिळवणे ही काळाची गरज आहे. गुन्हेवाढीसाठी काही प्रमाणात लोकसंख्यादेखील कारणीभूत आहे हे मुंबईसारख्या शहरातील गुन्हेगारी पाहिली तर आपल्याला दिसून येते.जिथे पैसे तिथे गुन्हे असे म्हटले जाते. 'एनसीआरबी'च्या आकडेवारीतील सायबर आणि आर्थिक गुन्हे पाहिले तर हे दिसून येते. या दोन्ही प्रकारच्या गुन्ह्यात मायानगरी मुंबई प्रथम स्थानी आहे. देशभरात २०२१ च्या तुलनेत गुन्हेगारीत सुमारे ११ टक्क्यांनी वाढ झाल्याचे आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. गंभीर बाब म्हणजे ५० कोटी किंवा त्यापेक्षा अधिक रकमेच्या आर्थिक फसवणुकीच्या गुन्ह्यांमध्ये महाराष्ट्र आघाडीवर आहे. बँकिंग फ्रॉड, हाउसिंग फ्रॉड, चिट फंडमधील गुंतवणूक, शेअर मार्केटच्या नावाने गुंतवणूक आणि सर्वांत महत्वाचे म्हणजे मल्टी लेव्हल मार्केटिंग. अधिक परताव्याच्या लालसेपोटी नागरिक पैसे गुंतवत जातात आणि या साखळीत असलेल्या सर्वांना कमिशन मिळत जाते. मात्र, एखाद्या दिवशी ही साखळी तुटते आणि पैसे बुडतात. आर्थिक गुन्ह्यांना व्हाईट कॉलर क्राइम असे संबोधिले जाते. कुठेही गुंतवणूक करताना बँक, पोस्ट किंवा इतर शासकीय वित्त संस्थांपेक्षा कुणीही व्यक्ती किंवा कंपनी ही गुंतवणुकीवर अधिक परतावा देत नाही आणि दिलाच तर त्यामध्ये काहीतरी काळंबेरं आहे हे प्रत्येकाने ध्यानात ठेवायला हवे. सध्या मुंबईतील रस्त्यावरील गुन्हेगारी कमी झाली नव्हे तर जवळपास संपलेली आहे. गुन्हेगारच नव्हे, तर अनेक टोळ्या आता सायबर गुन्हेगारीकडे वळल्या आहेत.सर्व काही आधुनिक होत आहे हे खरे, मात्र इंटरनेटवर वावरताना, ऑनलाइन पेमेंट करताना नेमके काय करावे, कोणती काळजी घ्यावी याबाबत लोकांमध्ये अद्यापही प्रचंड अज्ञान आहे. फेसबुकवर, इंस्टाग्राम प्रोफाइल तयार करून मित्र मैत्रीण गोळा करणे फक्त अनेकांना माहित असते, मात्र याच व्यासपीठाचा वापर करून सायबर गुन्हेगार तुम्हाला कधी फसवतील याचा नेम नाही. मॉर्फिग, फोटोमध्ये छेडछाड करून सेक्सटॉर्शन करणे, विवाह जुळविणाऱ्या वेबसाइटवरून तरुणींना जाळ्यात ओढणे, गृह कर्ज, पर्सनल लोन, नोकरी, पार्टटाइम नोकरी, आभासी चलनातील गुंतवणूक, कुरियर स्कॅम अशा कित्येक प्रकारे सायबर गुन्हेगार सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक फसवणूक करीत आहेत. सायबर गुन्हेगारी सुरूवातीला केवळ 'जामतारा पॅटर्न' प्रचलित होता, मात्र सद्यस्थितीत राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगड, झारखंड, दिल्ली यांसह देशाच्या अनेक भागात सायबर गुन्हेगारांच्या टोळ्या तयार होत आहेत. दहशतवाद्यांना प्रशिक्षण देतात त्याप्रमाणे सायबर गुन्हेगारांना फसवणुकीचे धडे देऊन प्रशिक्षित केले जात आहे. आगामी काळात जास्तीत जास्त सायबर पोलिस ठाणी सुरू करणे, पोलिसांना सायबर प्रशिक्षण सक्तीचे करणे, पोलिस दलासाठी अत्याधुनिक अद्ययावत यंत्रसामुग्री पुरविणे गरजेचे आहे. सायबर गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण अगदीच नगण्य आहे. काही वर्षांपूर्वी तर हे गुन्हेगार सापडणे अवघड मानले जायचे; परंतु सध्या या गुन्ह्यांत आरोपींची धरपकड होतेय ही जमेची बाजू आहे.सायबर साक्षरता ही काळाची गरज असून, प्रत्येक नागरिकाने सायबर सजग व्हायला हवे. दुसरीकडे हत्या, दरोडा अशा गंभीर गुन्ह्यांत कडक कलमे आणि तितक्याच जास्त शिक्षेची तरतूद आहे. अशीच जास्त शिक्षेची कलमे आर्थिक फसवणूक आणि सायबर गुन्ह्यासाठी असायला हवीत तरच या प्रकारच्या गुन्ह्यांना आळा बसेल.महाराष्ट्रात सुमारे अडीच लाखांचा तर एकट्या मुंबईत सुमारे चाळीस हजारांचा फौजफाटा आहे. हे आकडे जरी मोठे वाटत असले तरी लोकसंख्येच्या तुलनेत ही कुमक अपुरी आहे. त्यातच घरातील आत्महत्या, रस्त्यावरच्या हत्येपासून कायदा आणि सुव्यस्था बिघडविणाऱ्या दंगली, घातपात, दहशतवादी हल्ले रोखण्याचे मोठे आव्हान आणि तेवढाच कामाचा ताण पोलिसांवर असतो. त्यांना या कामात सर्वसामान्य नागरिकांचीही साथ मिळणे तितकेच गरजेचे आहे. सर्वसामान्य नागरिक हेच पोलिस यंत्रणेचे कान आणि डोळे असतात. हे अवयव जागृत राहिले तर कोणतेही गुन्हे रोखणे अवघड नाही.

# मराठा आरक्षण-मा.प्रकाश आंबेडकर !






गेल्या अनेक महिन्यापासून आपण महाराष्ट्रामध्ये पाहतोय की मराठा आरक्षणाची चळवळ मनोज जरांगे पाटलांच्या नेतृत्वामध्ये चालू असून, आता या मराठा आरक्षणाच्या आंदोलनाने जन आंदोलनाचे रूप घेतलेल आहे, महाराष्ट्र जवळपास १२ ते १३ कोटी लोकसंख्येचे हे राज्य असून यामध्ये जवळपास पाच कोटी लोकसंख्या ही मराठा समाजाची आहे या मराठा समाजावर पहिल्यापासूनच प्रस्थापित राजकीय पुढारी नेतेमंडळी आणि प्रशासनाने अन्यायाची भूमिका घेतलेली आहे, त्यामुळे हा समाज गेल्या ७० वर्षापासून शैक्षणिक आर्थिक नोकरी, सामाजिक सर्वच बाबतीमध्ये पिछाडीवर गेलेला दिसून येत आहे मुळातच शेती करणारा हा कुणबी समाज असून या समाजाचा आता कोणी वाली नाही की काय ही भावना या समाजाच्या तरुण आणि सर्व जण माणसांमध्ये निर्माण झालेली आहे, गेल्या तीन-चार महिन्यापासून आपण पाहतो की अंतर्वली सराटी येथे आमरण उपोषणाला बसलेल्या जरांगे पाटील आणि संपूर्ण ग्रामस्थ मंडळी महिला वृद्ध लहान मुलं यांच्यावरती पोलिसांकडून अमानुषपणे लाठी चार्ज गोळीबार करण्यात आला आणि त्यानंतर खऱ्या अर्थानं मनोज जरांगे पाटलांचे नाव जन मानसामध्ये संपूर्ण राज्य संपूर्ण देशात माहीत झालं, यामध्ये मा. प्रकाश आंबेडकर साहेब यांची भूमिका सामाजिक असेल, राजकीय असेल, की पहिल्यापासूनच मराठा कुणबी समाजाच्या बाजूनं राहिलेली आहे. केवळ राजकीय दृष्ट्या म्हणता येणार नाही तर याच ठिकाणी सामाजिक दृष्ट्या सामाजिक सलोखा राज्यातील समानता एकता राष्ट्रीयत्वता टिकण्यासाठी महाराष्ट्र संस्कृती आबादित राहण्यासाठी खूपच महत्त्वाची होती. महापुरुषांच्या घरामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापुरुषांच्या महामानवाच्या घरामध्ये त्यांचा जन्म झाला आणि त्यांचे नातू असणारे माननीय प्रकाश आंबेडकर साहेब यांची या जरांगे पाटील आणि मराठा आरक्षण चळवळीला पहिल्यापासूनच त्यांनी पाठिंबा देऊन महाराष्ट्रातील सामाजिक सलोखा अबाधित ठेवण्यासाठी एका मोठया मनानं विचारसरणीने त्यांनी काम केले आहे ,ज्यावेळेस संभाजी राजे छत्रपती संभाजी राजे उपोषणाला बसले होते मराठा आरक्षणासाठी त्यावेळेस सुद्धा स्वतःची तब्येत खराब असताना माननीय प्रकाश आंबेडकर साहेब हे त्या ठिकाणी जाऊन त्यांनी छत्रपती संभाजी राजांना मी केवळ पाठिंबा दर्शवला नाही तर मी तुमच्याबरोबर या आंदोलनामध्ये आहे ही भावना बोलून दाखवली होती म्हणून आज मराठा समाजावर कुणबी समाजावर जो अन्याय प्रस्थापित पुढारी प्रस्थापित नेते मंडळीकडून होतोय याला वाचा फोडण्याचे खऱ्या अर्थाने पहिल्यापासूनच काम खासदार आंबेडकर यांनी केलेल आहे. त्यांची भूमिका अशी होती ती प्रस्थापित नेते मंडळी जी की खास करून मराठा समाजातील आहेत हे निजामासारखे वागतात ते मंगरूर आहेत आणि ते गरजवंत असणाऱ्या गरीब मराठया वर पहिल्यापासून अन्याय करतात कारण त्यांना गरिबांना गरीब ठेवायच आहे .तरच त्यांचा प्रस्थापितपणा टिकेल येथे पहिल्यापासून बोलून दाखवत होते ,आणि त्यांचे ते वाक्य आज खरे होताना दिसून येत आहेत खऱ्या अर्थाने मराठा समाजाला आणि मराठा समाजाच्या कुणबी आरक्षणाला विरोध मराठा समाजातीलच प्रस्थापित मोठे पुढारी नेतेमंडळी करतात यामध्ये सर्वच पक्षाचे आहेत हे करताना आज दिसून येत आहे म्हणून हा लढा आता गरजवंत मराठ्यांचा आहे जो की ९७, ९८ टक्के मराठा कुणबी समाज हा गरीब आहे त्यांचा हा लढा आहे. आणि या मराठा कुणबी समाजाचे राजकीय नेतृत्व करणारे आणि त्यांचं नेतृत्व करणारे प्रस्थापित पुढारी संस्थानिक कारखानदार शिक्षण सम्राट हे एक टक्का आहेत त्यांच्यामुळे गरीब समाजावर अन्याय होतोय ही भावना जागृत करण्याचे काम माननीय प्रकाश आंबेडकर साहेब यांनी पहिल्यापासूनच केलेल आहे या आधी महाराष्ट्रामध्ये जे मूक मोर्चा ५८ मूक मोर्चा निघाले त्यामध्ये सुद्धा आंबेडकर साहेबांनी स्वतः सामील होऊन या मराठा आरक्षण चळवळीला पाठिंबा दिलेला आहे .कारण त्यांच्यावर जो अन्याय होतो आहे तो आता संहनशक्तीच्या पलीकडे गेला आहे आणि म्हणून त्यांना सुद्धा या सामाजिक प्रवाहामध्ये आणण्यासाठी मोठ्या विचारांने आपण यामध्ये उतरले पाहिजे ही त्यांची भावना यातून आपल्या निदर्शनास येते. ज्यावेळेस अंतरवली सराटी या ठिकाणी जरांगे पाटील आणि त्यांच्या संपूर्ण उपोषणकर्त्यावर ग्रामस्थ मंडळीवर पोलिसांकडून अमानुष लाठी चार्ज झाला त्यावेळेस सर्वात आधी मा. आंबेडकर साहेब त्या ठिकाणी त्यांना भेटायला गेले होते , आम्ही तुमच्याबरोबर आहोत हा संदेश त्यांनी संपूर्ण महाराष्ट्राला आणि संपूर्ण देशाला त्यानिमित्ताने दिलेला होता, हे आपल्याला विसरता येणार नाही पहिल्यापासूनच प्रस्थापित पुढारी मंडळींच्या विरोधात आवाज उठवून आणि त्यांचा अन्याय तुमच्या गरीबावर कसा होतो हे दाखवण्याचं काम मा. प्रकाश आंबेडकर साहेबांनी पहिल्यापासूनच केलेल आहे खऱ्या अर्थानं जरांगे पाटील सुद्धा आंबेडकर साहेबांचे या ठिकाणी सल्ला घेतात असे त्यांच्या ते मुलाखतीमध्ये वारंवार सांगत असतात. म्हणून मोठ्या प्रमाणामध्ये त् हे जन आंदोलन चालू असताना या महाराष्ट्राने अनेक आत्महत्या तरुण मुलांच्या मराठा आरक्षणासाठी पाहिलेल्या आहेत त्यावेळेस सुद्धा मा. प्रकाश आंबेडकर यांनी मुलांनो आत्महत्या करू नका हा प्रश्न लवकरच सुटेल आणि पुरोगामी असणारा महाराष्ट्र सर्व समाज सुखाने एक दुसऱ्याबरोबर नांदतील ही भावना त्यांनी त्या ठिकाणी सांगितली होती. आणि मुलांनो आत्महत्यांनी हा प्रश्न सुटणार नाही ही लढाई गरिबांची लढाई आहे ही लढूनच जिंकावी लागेल ही भावना त्यांनी समाज मानसामध्ये मराठा समाजाच्या निर्माण करून दिलेली आहे आणि आत्महत्याने हा प्रश्न सुटणार नाही इथे वारंवार सांगताना आपण पाहिले आहे म्हणून जरांगे पाटला सारख्या एका सामान्य कुटुंबातून आलेल्या सामान्य कार्यकर्त्याला एवढ्या मोठ्या माणसानं मोठा विचार आणि पाठिंबा दिला आहे खऱ्या अर्थाने विचाराची लढाई आहे आणि प्रकाश आंबेडकर साहेबांचे मोठेपण आहे की ते आज डॉ. बाबासाहेबांचे वारस आहेत त्यांच्या विचाराला त्यांच्या प्रेरणेला जरांगे पाटलांनी डोक्यावर घेतलेल आहे. आणि म्हणून इथून पुढच्या काळामध्ये प्रस्थापित पुढारी विरुद्ध गरजवंत मराठा कुणबी ही लढाई आता महाराष्ट्र तर पाहतोच आहे, परंतु या मराठा आरक्षणाचे नेतृत्व करणारे जरांगे पाटील यांच्याकडे एक दोन एकर जमीन आहे ,त्यांचे बँकेमध्ये खात नाही ज्यांच्याकडे कुठलीही शिक्षण संस्था नाही ज्यांच्याकडे आणखी कुठलेही साधन नाही ते एक सामान्य कार्यकर्ता मी तुमचा सेवक आहे, ज्याने स्वतःच्या प्रपंचावर समाजासाठी तुळशी पत्र वाहून घेतल आहे. आणि त्यातही समाजाला न्याय देण्याच्या भूमिकेतून रात्रंदिवस झटणारा म्हणून जरांगे पाटला सारखा नेता आज मराठा आरक्षण चळवळीला मिळालेला आहे .आणि त्यात माननीय प्रकाश आंबेडकर यांच त्यांना जर सहकार्य मिळालं तर निश्चितच ही मराठा समाजाच्या अन्यायाला वाचा फोडणारी गोष्ट भविष्यामध्ये घडनार ही अपेक्षाच आहे, मराठा समाज मनोज जरांगे पाटलाला आपला आदर्श नेता मानतो आहे. आणि अशा परिस्थितीमध्ये प्रस्थापित पुढारी त्यांना सहकार्य करीत नाहीत, अशावेळी डॉक्टर आंबेडकरांचे वारस असणारे मा. प्रकाश आंबेडकर त्यांना सहकार्य करतात हे खऱ्या अर्थाने मराठा समाजासाठी नव्हे नव्हे महाराष्ट्रासाठी महाराष्ट्राच्या पुरोगामित्वासाठी या देशाच्या लोकशाहीसाठी ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट महाराष्ट्र मध्ये घडताना दिसून येत आहे ,याने सामाजिक एकता, राष्ट्रीयत्वता , समानता एकता याचा संदेश संपूर्ण महाराष्ट्रात आज जातो आहे महाराष्ट्रातील काही सत्ताधारी असणारे काही मंत्री आज महाराष्ट्रातील सामाजिक वातावरण बिघडवण्याचे काम करीत आहेत, अतिशय असंवेधनशील विधान करून महाराष्ट्रामध्ये दंगली घडवण्याचा घाट ते आज करत आहेत, समाजा समाजामध्ये मतभेद निर्माण करून स्वतःची राजकीय पोळी भाजण्याचे काम या पुढार्याकडून आज होताना दिसत आहे, आणि समाजा समाजामध्ये मनभेद करून स्वतःचे राजकीय डाव साधण्याच्या यांच्या चाली महाराष्ट्र ओळखत आहे, अशाही परिस्थितीमध्ये केवळ सामाजिक सलोखा टिकण्यासाठी तुम्ही आम्ही भाऊ भाऊ आहोत ही भूमिका घेऊन मा.प्रकाश आंबेडकर जरांगे पाटलांना या ठिकाणी साथ देत आहेत, ही खऱ्या अर्थानं या महाराष्ट्राच्या विचाराला आणि पुरोगामित्वाला पुढे नेणारी आणि सामाजिक सलोखा टिकवणारी गोष्ट आहे म्हणून निश्चितच मराठा आरक्षणाच्या चळवळीमध्ये नेतृत्व करणारे निःस्पृह असणारे मनोज जरांगे पाटील आणि त्यांना साथ देणारे माननीय प्रकाश आंबेडकर यांच्यामुळे मराठा आरक्षणाची ही लढाई, समाजावर अन्याय करणारे प्रस्थापित त्यांच्याविरुद्ध लढणारे गरजवंत गरीब मराठे आणि यांची ही लढाई आहे, म्हणून या लढाईमध्ये मा. प्रकाश आंबेडकर यांचे सहकार्य कुणबी समाज मराठा समाज विसरणार नाही, आणि म्हणून निश्चितच गरजवंत मराठ्यांना भविष्यामध्ये यांच्यामुळे न्याय मिळेल ही अपेक्षा आहे..

# सार्वभौमता आणि अखंडतेला प्राधान्य



जम्मू-काश्मीरचा विकास, तेथील जनतेच्या आशा-आकांक्षाची पूर्तता हे ध्येय ठेवून राज्यघटनेतील कलम रद्द करण्याचा निर्णय सरकारने घेतला. सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निर्णयाने सरकारच्या प्रयत्नांना आता बळ मिळाले आहे.भा रताच्या सर्वोच्च न्यायालयाने ११ डिसेंबर रोजी राज्यघटनेचे कलम ३७० आणि ३५(ए) रद्दबातलसंदर्भात ऐतिहासिक निर्णय दिला. या निकालाद्वारे न्यायालयाने देशाची सार्वभौमता आणि अखंडतेला प्राधान्य दिले आहे. ५ ऑगस्ट २०१९ रोजी घेतलेला निर्णय घटनात्मक एकात्मता वृद्धींगत करण्याच्या उद्देशाने च होता, विघटीत करण्यासाठी नव्हे याची नोंद न्यायालयाने घेतली.कलम ३७० कायमस्वरूपी नव्हते, या बाबीची दखलही न्यायालयाने घेतली. जम्मू, काश्मीर आणि लडाखचा नितांतसुंदर निसर्ग, शांततेची अनुभूती देणारी खोरी, भव्य डोंगर कलाकारांना आणि साहसीवीरांना साद घालत आहेत. तिथे उदात्तता आणि अलौकिकता यांचा संगम होतो. तिथे हिमालय आकाशाला गवसणी घालतो आणि सरोवरे व नद्यांचे नितळ पाणी स्वर्ग प्रतिबिंबित करतात.मात्र गेल्या सात दशकांपासून या ठिकाणांनी हिंसाचाराचे उग्र रूप आणि अस्थैर्य अनुभवले आहे. माझ्या जीवनाच्या सुरवातीपासूनच जम्मू-काश्मीर आंदोलनाशी जोडले जाण्याची संधी मला मिळाली. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी नेहरू मंत्रिमंडळात महत्त्वाचे खाते संभाळत होते. सरकारमध्ये दीर्घकाळ राहू शकले असते. तरीही काश्मीर मुद्यावर ते मंत्रिमंडळातून बाहेर पडले.त्यांनी खडतर मार्ग स्वीकारला, जो त्यांच्या जीवावर बेतला. त्यांचे प्रयत्न आणि त्यागामुळे काश्मीर मुद्दा कोट्यवधी भारतीयांशी भावनिकदृष्ट्या जोडला गेला. त्यानंतर काही वर्षांनी अटलबिहारी वाजपेयींनी 'इन्सानियत', 'जम्हूरियत' आणि 'काश्मिरीयत' हा प्रभावी संदेश दिला, जो सदैव स्फूर्तीचा मोठा स्त्रोत ठरला.माझा हा कायम विश्वास होता की, जम्मू-काश्मीरमध्ये जे काही झाले, ती देशाची व तेथील नागरिकांचीही फसवणूक होती. देशावरचा हा कलंक, तिथल्या लोकांवरील अन्याय दूर करण्यासाठी मला जे काही करता येईल, ते करण्याची माझी तीव्र इच्छा होती. स्पष्ट सांगायचे तर- कलम ३७० आणि ३५(अ) हे त्यातील महत्त्वाचे अडथळे होते. असे वाटायचे, की ही कलमे म्हणजे जणू अडथळ्याची भक्कम भिंत आहे.कलम ३७० आणि ३५(अ)मुळे, जम्मू-काश्मीरच्या नागरिकांना त्यांचे हक्क व त्यांच्या अन्य देशबांधवांना मिळणारी, तेवढ्याच हक्काची विकासाची फळे त्यांना कधीही मिळाली नसती. या कलमांमुळे एकाच देशातल्या लोकांमध्ये अंतर निर्माण झाले होते. त्यामुळे जम्मू-काश्मीरच्या समस्या दूर करण्यास इच्छुक लोकांना कितीही इच्छा असली तरीही काही करता येत नव्हते.मलाही या समस्येशी संबंधित गुंतागुंतीची जाणीव होती. तरीही वाटत होते की, जम्मू-काश्मीरच्या लोकांना विकास हवा आहे. त्यांना त्यांची बलस्थाने आणि कौशल्ये यांच्या बळावर भारताच्या विकासात योगदान द्यायचे आहे. त्यांच्या मुलांसाठी हिंसाचार आणि अनिश्चिततेपासून मुक्त उत्तम आयुष्य व भविष्य हवे आहे.जम्मू-काश्मीरच्या लोकांची सेवा करताना आम्ही तीन मुद्दांना प्राधान्य दिले. नागरिकांच्या समस्या जाणणे, पाठबळदर्शक कृतींद्वारे जनतेत विश्वास निर्माण करणे आणि तिसरे विकास, विकास आणि केवळ विकासाला प्राधान्य देणे. २०१४ मध्ये आम्ही कार्यभार स्वीकारल्यानंतर लगेचच जम्मू-काश्मीरमध्ये भीषण पूर आला, मोठे नुकसान झाले. पूरग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी विशेष सहाय्यापोटी एक हजार कोटी रुपयांची मदत दिली.संकटग्रस्तांना सावरण्याच्या आमच्या सरकारच्या वचनबद्धतेचे हे द्योतक होते. त्यावेळी मला विविध क्षेत्रातल्या लोकांना भेटण्याची संधी मिळाली. त्यांच्याशी संवादांमध्ये समान धागा होता तो लोकांना केवळ विकासच नको होता तर भ्रष्टाचारापासून मुक्तताही हवी होती. त्याच वर्षी, जम्मू-काश्मीरमध्ये ज्यांनी प्राण गमावले त्यांच्या स्मरणार्थ मी दिवाळी साजरी न करण्याचा निर्णय घेतला.जम्मू-काश्मीरच्या विकासयात्रेला बळ देण्यासाठी सरकारमधील मंत्री तिथे वरचेवर भेट देतील, लोकांशी संवाद साधतील असा निर्णय घेतला. नागरिकांमध्ये सद्भावना निर्माण करण्यात या दौऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. मे २०१४ ते मार्च २०१९ पर्यंत दिडशेहून अधिक मंत्रीस्तरीय दौरे झाले. हा विक्रमच आहे.२०१५मध्ये जाहीर केलेले विशेष पॅकेज जम्मू-काश्मीरच्या विकासात्मक गरजा पूर्ण करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल ठरले. त्यात पायाभूत सुविधांचा विकास, रोजगारनिर्मिती, पर्यटनाला चालना आणि हस्तकला उद्योगाला प्रोत्साहनासाठी पुढाकार घेतला होता.युवकांची स्वप्ने साकार करण्यासाठी खेळांची क्षमता ओळखून आम्ही जम्मू-काश्मीरमध्ये क्रीडा उपक्रम राबवले. स्पर्धेच्या आयोजनाच्या ठिकाणी सुधारणा केल्या, प्रशिक्षक उपलब्ध करून दिले. प्रशिक्षण दिले. स्थानिक फुटबॉल क्लबच्या स्थापनेला प्रोत्साहन ही अनोखी गोष्ट होती. त्याचे उत्तम परिणाम दिसले. डिसेंबर २०१४मध्ये अफशान आशिक या प्रतिभावान फुटबॉलपटूचे नाव माझ्या मनात आले.ती श्रीनगरमध्ये दगडफेक करणाऱ्या एका गटाचा भाग होती; परंतु योग्यवेळी प्रोत्साहनामुळे फुटबॉलकडे वळली. तिला प्रशिक्षणासाठी पाठवले आणि तिने खेळात प्रावीण्य मिळवले. आता इतर युवकही किकबॉक्सिंग, कराटे आणि अन्य क्रीडा प्रकारात चमक दाखवत आहेत.पंचायत निवडणुका हाही या प्रदेशाच्या सर्वांगीण विकासाच्या वाटचालीतील महत्त्वपूर्ण क्षण होता. पुन्हा एकदा आमच्यासमोर सत्तेत राहण्याचा किंवा आमच्या तत्त्वांचे पालन करण्याचा पर्याय होता. ही निवड करणे काही कठीण नव्हते आणि आम्ही सत्ता सोडली, मात्र आमच्या आदर्शांना, जम्मू-काश्मीरच्या लोकांच्या आकांक्षाना सर्वोच्च प्राधान्य दिले.पंचायत निवडणुकीतील यशाने लोकांचा लोकशाहीवरील विश्वास स्पष्ट झाला. मला तिथल्या गावप्रमुखांशी झालेला संवाद आठवतो. इतर समस्या लक्षात घेऊन, मी त्यांना विनंती केली, काहीही झाले तरी शाळा जाळल्या जाऊ देऊ नका! त्याचे पालन झाल्याचे पाहून मला आनंद झाला.प्रत्येक भारतीयाच्या हृदयात ५ ऑगस्ट हा ऐतिहासिक दिवस कोरलेला आहे. संसदेने कलम ३७० रद्द करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. तेव्हापासून जम्मू-काश्मीर आणि लडाखमध्ये बरेच बदलले झाले. आता चार वर्षांनी, डिसेंबर २०२३मध्ये न्यायालयाचा निकाल आला असला तरी जम्मू-काश्मीर आणि लडाखमधील विकासाची लाट पाहून जनतेच्या न्यायालयाने कलम ३७० आणि ३५(अ) रद्द करण्याच्या निर्णयाला जोरदार समर्थन दिले आहे.राजकीय स्तरावर तळागाळातील लोकशाहीवर पुन्हा विश्वास निर्माण झाल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे. महिला, आदिवासी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि समाजातील उपेक्षित घटकांना त्यांचे हक्क मिळत नव्हते, लडाखच्या आकांक्षांकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत होते. ५ ऑगस्ट २०१९ या तारखेने हे सर्व बदलले. सर्व केंद्रीय कायदे निर्भयपणे आणि निःपक्षपणे लागू होत आहेत. प्रतिनिधित्वही व्यापक झाले आहे.त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्था अस्तित्वात आहे, बीडीसी निवडणुका झाल्या. दुर्लक्षित निर्वासित समुदायाने विकासाची फळे चाखायला सुरुवात केली आहे. केंद्र सरकारच्या योजनांची चांगली कार्यवाही होत आहे. या योजना समाजातील सर्व स्तरांपर्यंत पोहोचल्या आहेत. यामध्ये 'सौभाग्य', 'उज्ज्वला' योजनांचा समावेश आहे. गृहनिर्माण, नळपाणी योजना आणि आर्थिक समावेशनात मोठा पल्ला गाठला आहे.आरोग्य क्षेत्रातील पायाभूत सुविधांचे व्यापक आधुनिकीकरण झाले आहे. सर्व गावांना ओडीएफ प्लस दर्जा मिळाला आहे. एकेकाळी भ्रष्टाचाराचे कुरण असलेल्या आणि ओळखी, शिफारशींचे क्षेत्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सरकारी नोकऱ्यांमधील पदे पारदर्शक आणि योग्य प्रक्रियेद्वारे भरली आहेत. आयएमआरसारख्या इतर निर्देशांकांमध्येही सुधारणा दिसते. पायाभूत सुविधा आणि पर्यटनाला चालना मिळाली. त्याचा लाभ सर्वांना होत आहे.साहजिकच याचे श्रेय जम्मू-काश्मीरच्या जनतेच्या चिवट वृत्तीला आहे. त्यांना केवळ विकास हवा आहे. सकारात्मक बदलाचे कारक बनण्याची त्यांची इच्छा आहे. जम्मू-काश्मीर आणि लडाखच्या परिस्थितीबाबत पूर्वी प्रश्नचिन्ह असे. आता त्या जागी विक्रमी वृद्धी, विक्रमी विकास, पर्यटकांचा विक्रमी ओघ ही सकारात्मक विकासाची पाऊलचिन्हे दिसत आहेत. या निकालाने 'एक भारत, श्रेष्ठ भारत' ही भावना बळकट झाली आहे.

# कांद्याचा प्रश्न सोडवा,दुधाला योग्य तो भाव द्या मागणीवरुन अंजनवती येथील शेतकरी आक्रमक

**बीड । प्रतिनिधी**

अकाळी पाऊस व गारपिटीमुळे जिल्ह्यातील शेतकरी अगोदरच हैराण झाला आहे त्यातच केंद्र सरकारने कांद्याची निर्यातबंदी थांबवल्याने व कांद्याचे भाव घसरल्याने शेतकरी अधिकच अडचणी आला आहे तसेच पेट्रोल व डिझेल मधे इथेनॉल न मिसळण्याचा निर्णय त्वरित मागे घेऊन दुधाला प्रति लिटर पन्नास रुपये भाव देण्यात यावा या मागण्यांसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ या प्रश्नी केंद्रीय कृषीमंत्र्याची भेट घेवून हा प्रश्न सोडवावा अन्यथा रस्त्यावर उतरू आंदोलन छेडू असा इशारा अंजनवती ग्रामस्थांनी दिला आहे.पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, दुष्काळी परिस्थिती त्यातच अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे बीड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात कांदा पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे त्यातच केंद्र शासनाने कांदा निर्यातबंदी घोषित केल्यामुळे शेतकरी अधिकच अडचणीत सापडला असून कांद्याचे भाव घसरल्यामुळे उत्पादन व झालेला खर्च याचा ताळमेळ लागत नसल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे त्याचबरोबर पेट्रोल व डिझेलमध्ये इथेनॉलचे मिश्रण करता येणार नाही त्यामुळे ऊस उत्पादक शेतकरी सुद्धा अडचणीत येणार असून दुधाचे दर अचानक घसरल्याने शेतकर्यांचा मुख्य जोडधंदा म्हणून ओळखला जाणारा दुग्ध व्यवसाय कोलमडून पडण्याची स्थिती निर्माण झाली आहे.त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी तात्काळ केंद्रीय कृषिमंत्र्यांची भेट घेऊन कांद्यावरील निर्यात बंदी उठवावी, पेट्रोल व डिझेल मधे इथेनॉल न मिसळण्याचा निर्णय त्वरित मागे घेऊन दुधाला प्रति लिटर पन्नास रुपये भाव देण्यात यावा या मागण्यांसाठी अंजनवती येथुन भाजपा किसान मोर्चाचे माजी बीड तालुकाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांच्या नेतृत्वाखाली वरील मागण्यासाठी एल्गार पुकारला असून मागण्या मान्य न झाल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे याप्रसंगी कृष्णा शिंदे, गोरख येडे, कल्याणराव येडे, नारायण पांचाळ, रामभाऊ येडे, अण्णा कारभारी,बाबुतात्या येडे, दादाराव येडे, भिमराव काटवटे, प्रल्हाद सोनवणे,मनोहर मोरे, साहेबखॉ पठाण,सुरेश मोरे, शेषेराव पाटील, भगवानभाऊ येडे, राजाराम थोरात, हरेकृष्ण काका,तुकाराम मोरे, बन्सीधर शिंदे, अंकुश चाळक, गोविंद भूमकर आदींची उपस्थिती होती.



## जरांगे अन् त्यांच्या सहकाऱ्यांकडे पिस्तुलं:मंत्री छगन भुजबळ यांची तपासणी करण्याची मागणी



**नागपूर**–राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे पाटील व त्यांच्या भोवती असणाऱ्या माणसांकडे वेगवेगळ्या प्रकारची शस्त्र व पिस्तुले असल्याचा दावा केला आहे. मनोज जरांगे व त्यांच्यासोबत असणाऱ्या लोकांची चौकशी करा. ते काळे धंदे करणारे लोक आहेत. त्यांच्याकडे पिस्तुलासारखी वेगवेगळी शस्त्रे सापडतील, असे भुजबळ म्हणालेत.मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी गुरुवारी पुन्हा एकदा ओबीसी नेते छगन भुजबळ यांच्यावर एकेरी शब्दांत टीका केली. छगन भुजबळ एकदा तुरुंगात जावून आलेत. त्यांना पुन्हा त्यात जायचे नाही, त्यामुळे त्यामुळे ते माझ्या जिवाला धोका आहे, माझी छाती दुखत आहे, असे खोटेनाटे सांगून वेळ मारू नेत आहेत, असे ते म्हणाले. बीडमधील हिंसाचारामागे भुजबळ असल्याचा आरोपही त्यांनी केला होता. त्यांच्या या टीकेला भुजबळ यांनी सडेतोड प्रत्युत्तर दिले.छगन भुजबळ म्हणाले की, मनोज जरांगे व त्यांच्यासोबत असणाऱ्या लोकांची चौकशी करा. त्यांच्याकडे पिस्तुलासारखी वेगवेगळी शस्त्रे सापडतील. त्या माणसांवर किती खटले आहेत हे सुद्धा तपासा. त्यात कितीतरी वाळू माफिया व काळे धंदे करणारे लोक आहेत.भुजबळ पुढे बोलताना म्हणाले की, सरकारकडून कुणबी नोंदी असणाऱ्या मराठा कुटुंबांना कुणबी प्रमाणपत्र दिले जात आहे. त्यामुळे या लोकांचा ओबीसी आरक्षणात समावेश होईल.हे अत्यंत बालिश आरोप आहेत. मी बीडमध्ये जावून एवढी मोठी दंगल करू शकतो का? मुळात असे करण्याचे कारणच काय? या दंगलीप्रकरणी पकडण्यात आलेली पिस्तुलधारी माणसे मनोज जरांगे यांची आहेत. बीडमधील हिंसाचाराप्रकरणी पोलिसांनी पकडलेली माणसे जरांगे यांच्याबरोबर २४ तास राहणारी होती, असे छगन भुजबळ यांनी ठणकावून सांगितले.छगन भुजबळ पुढे बोलताना म्हणाले की, बीडच्या घटनेशी माझा संबंध काय? गेली कित्येक वर्षे मी बीडला गेलो नाही. तिथे जाऊन मी माझ्याच लोकांची घरे जाळणार काय? मी एवढा अमानुष नाही. ज्या पद्धतीने त्यांनी हे सर्व केले, तेवढा मी अमानुष नाही. मी मागील ५७ वर्षांपासून सक्रीय राजकारणात आहे. मी वेगवेगळ्या प्रकारची आंदोलने केली. प्रसंगी जीवही धोक्यात टाकला. पण मी कुणालाही साधा दगड मारला नाही. असा कोणताही अहवाल माझ्याविरोधात नाही.

## रोहित पवारांनी बेलगाम आरोप करुन सूर्यावर थुंकण्याचा प्रयत्न करु नये–खा.सुनील तटकर



**मुंबई**–आयुष्यभर खोटे बोलणाऱ्या जितेंद्र आव्हाड यांच्याकडे लक्ष द्यायला आम्हाला वेळ नाही. तर रोहित पवारांनी बेलगाम आरोप करुन सूर्यावर थुंकण्याचा प्रयत्न करु नये, असे अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी म्हणत राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड आणि रोहित पवार यांच्यावर हल्लाबोल केला आहे.दरम्यान सुनील तटकरे पुढे बोलताना म्हणाले की, काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी काढलेल्या यात्रेनंतर, रोहित पवार यांनी यात्रा काढली. राहुल गांधींपेक्षा त्यांची यात्रा मोठी होती असे त्यांना वाटते. त्यामाध्यमातून त्यांना मिळालेला आनंद नैराश्यच्या माध्यमातून त्यांना झाकता येते नाही. त्यामुळे अशा प्रकारची वक्तव्ये करण्यात येत आहेत. बेलागम आरोप करण्यात येत आहेत. रोहित पवारांनी सूर्यावर थुंकण्याचा प्रयत्न करू नये, असाटोला त्यांनी लगावला आहे.सुनील तटकरे म्हणाले की, अजित पवार यांना त्यांच्या गुणवत्तेवर संधी मिळाली आहे. पहिली त्यांनी लोकसभा निवडणूक लढलेली होती. त्यानंतर त्यांना प्रत्येकवेळी मताधिक्य मिळाले आहे. आज ४३ आमदार बाहेर पडले, कारण अजित पवार यांनी त्यांच्यासाठी काहीतरी केले आहे म्हणूनच. आमदार यांनी जे पत्र दिले होते ते विधीमंडळ नेता निवडीसाठी दिली होते. तर अजित पवार यांनी कायम स्वत:चे नाव समोर केले. आयुष्यभर खोटे बोलणाऱ्या जितेंद्र आव्हाड यांच्याकडे लक्ष द्यायला आम्हाला वेळ नाही. अजित पवार यांना विरोधी पक्षनेते करावे यासाठी आमदारांनी स्वतः पुढाकार घेऊन सह्या केल्या होत्या. सर्व काही हातून गेले की असे बेलगाम दावे केले जातात. भाजपसोबत जाण्याबरोबरच जितेंद्र आव्हाड ज्या पत्राचा उल्लेख करत आहेत, त्या पत्रबाबात मला माहिती नाही. भाजपसोबत सत्तेत सहभगी होण्यासाठी सगळ्यांनी सह्या केल्या होत्या.सुनील तटकरे म्हणाले की, जितेंद्र आव्हाड यांना विरोधी पक्षनेते व्हायचे होते. मात्र त्यासाठी गुणवत्ता लागते. शरद पवार यांची राजकारणातील ६० वर्षांची तपश्चर्यामधून हे माहिती झाले आहे की कुणाला संधी द्यायची. मी लायक हा शब्द वापरणार नाही. त्यासाठी गुणवत्ता हवी असते असे म्हणत आव्हाडांना टोला लगावला आहे.

# ज्यांच्याकडे कुणबी नोंदी, त्यांना प्रमाणपत्र देण्याला विरोध नाही – विजय वडेट्टीवार

**नागपूर**–ज्यांच्याकडे कुणबी नोंदी आहेत त्यांना प्रमाणपत्र देण्याला विरोध नाही, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी हे स्पष्ट केले आहे. त्यांनी पत्रकारांशी साधलेल्या संवादादरम्यान आपली भूमिका स्पष्ट केली. राज्यात सध्या सुरु असलेल्या मराठा आंदोलनावर त्यांनी या वेळी विवध प्रश्नांची उत्तरे दिली. मागासवर्ग आयोगातील सदस्यांच्या राजीनाम्यावरुनही त्यांनी राज्य सरकारवर टीका केली.विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज सुयोग पत्रकार निवास येथे भेट दिली व विविध माध्यम प्रतिनिधींसोबत मनमोकळा संवाद साधला. सुयोग पत्रकार शिबीराचे प्रमुख दिलीप जाधव यांनी विजय वडेट्टीवार यांचे स्वागत केले. मागासवर्ग आयोगातील सदस्यांचा राजीनामा, शेतकऱ्यांचे प्रश्न, ओबीसी आरक्षण, मराठा आरक्षण, पाच राज्यांमध्ये पार पडलेल्या निवडणुका अशा विविध विषयावर वडेट्टीवार यांनी पत्रकारांशी संवाद साधला.या वेळी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, मागासवर्ग आयोगातील सदस्यांचा राजीनामा हा राजकीय दबावापोटी झाला आहे. सरकारला ओबीसी प्रतिनिधित्व करणारे लोक नको होते आणि त्यात ते यशस्वी झाले. एका मागून एक सदस्यांनी दिलेल्या राजीनामा बाबत सभागृहात मुद्दा मांडणार असल्याचे वडेट्टीवार यांनी सांगितले. मराठा आरक्षण संदर्भात आपली भूमिका मांडताना वडेट्टीवार म्हणाले की, मराठा समाजाला आरक्षण दिले पाहिजे. ज्यांच्याकडे कुणबी नोंदी आहेत त्यांना प्रमाणपत्र देण्याला विरोध नाही, असे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले.अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासून शेतकरी प्रश्नावर विरोधी पक्षाने आक्रमक भूमिका घेतली आहे. मात्र सरकार शेतकरी विषयावर अभ्यास करून शुक्रवारी उत्तर देणार असल्याचा टोमणा विरोधी पक्षनेते यांनी मारला. यावेळी सुयोग निवासी पत्रकार मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.एस.टी कामगारांच्या महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट सहकारी बँकेमधील आर्थिक अनियमितता प्रकरणी महिनाभरात चौकशी पूर्ण करून दोषींवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज सभागृहात प्रश्नोत्तराच्या तासात केली. विजय वडेट्टीवार म्हणाले, महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट सहकारी बँक ही सर्वसामान्य माणसांची बँक आहे. यामध्ये आर्थिक घोटाळे झाल्याची माहिती आहे. कर्जाचे व्याजदर ९ टक्के व १४ टक्के वरून ७ टक्के इतके कमी करण्याचा ठराव बँकेने घेतला. या ठरावामुळे बँकेचे आर्थिक नुकसान होणार असल्याचे भारतीय रिझर्व बँकेने १५ सप्टेंबर २०२३ च्या पत्रान्वये महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट सहकारी बँकेला निर्देश दिले आहेत. आरबीआयच्या पत्रापूर्वीच सहकार विभागाने लक्ष घातले असते तर ही वेळ आली नसती. यात मोठ्या प्रमाणात आर्थिक घोटाळे झाल्याची माहिती आहे. त्यामुळे चौकशीचा कालावधी कमी करून एक महिन्याच्या आत किंवा पंधरा दिवसात चौकशी पूर्ण करून प्रशासक नेमण्याची विनंती केली.



## केदार हॉस्पिटलच्या तृतीय वर्धापन दिनानिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबीर पंधरवडा

**सांगोला**–सांगोला येथील वासुद रोड दत्तनगर जवळ असणाऱ्या केदार हॉस्पिटल येथे हॉस्पिटल च्या तृतीय वर्धापनदिनानिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबीर पंधरवडा याचे आयोजन केले आहे. दिनांक १५ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०२३ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सदरच्या शिबिरामध्ये स्त्रीरोग-प्रसूतीशास्त्रतज्ञ ,मेडिसिन-आय.सी.यु. तज्ञ, मूत्ररोग तज्ञ डॉक्टर उपलब्ध राहणार असून तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत स्त्रीरोग, हृदयरोग-उच्चरक्तदाब,मूत्ररोग निदान तपासणी शिबिर पार पडणार आहे.मोफत स्त्रीरोग तपासणी डॉ.दिव्यता केदार (एम.एस. स्त्रीरोग-प्रसूती शास्त्रतज्ञ ) यांचे मार्फत स्त्रीयांचे सर्व प्रकारचे आजार ,मासिक पाळीचे आजार,गरोदर स्त्री तपासणी, स्त्री-पुरुष वंध्यत्व,गर्भाशय पिशवीचे आजार इ.आजारांवर तपासणी होणार आहे तसेच मोफत हृदय रोग-उच्च रक्तदाब तपासणी व मोफत मूत्ररोग तपासणी डॉ निरंजन केदार (एम.डी.मेडिसिन ) आणि मूत्ररोग तज्ञ डॉक्टर यांचे मार्फत हृदयरोग, उच्च रक्तदाब, मधुमेह,दमा, थायरॉईड, श्वसनाचे आजार,पोटाचे आजार,मेंदूरोग ,मूत्ररोग,मुतखडा,प्रोस्टेट ग्रंथीची सूज,मूत्राशयाचे आजार ,किडनीचे आजार,किडनीतील खडे,मूत्रवाहिनी मधील खडे,मूत्राशयातील खडे ,मूत्रमार्गातील खडे ,अन्य मूत्रविकार इ.या सर्व आजारांवर मोफत निदान यामध्ये तज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी केली जाणार आहे.केदार लॅबोरेटरी यांचे मार्फत मोफत हृदयाची तपासणी-इ. सी. जी.,मोफत रक्त तपासणी-सी.बी. सी. रक्तातील हिमोग्लोबिन, साखर, रक्तगट तपासणी केली जाणार आहे.तरी सांगोला तालुक्यातील व पंचक्रोशीतील सर्व गोर-गरीब गरजू रुग्णांनी दिनांक १५ डिसेंबर ते ३० डिसेंबर या पंधरवड्यात खालील फोनवरती संपर्क साधून या शिबिराचा लाभ घ्यावा.संपर्क-९१४५१२४५७९,८०१०५५११०८

## 'पीएचडीबाबत माझ्या तोंडातून शब्द गेला' अजित पवार यांनी व्यक्त केली दिलगिरी

### माझ्या बोलण्याचा विपर्यास केला–अजित पवार



**नागपूर**–उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अधिवेशनकाळात पीएचडीबद्दल वादग्रस्त वक्तव्य केले होते. यावरुन विरोधकांनी अजित पवारांवर टीका केली आहे. यावरुन अजित पवारांनी देखील विरोधकांवर पलटवार केला आहे. इतकेच नाही तर या संदर्भात आपण दिलगिरी देखील व्यक्त केली असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. पीएचडीबाबत माझा तोंडातून शब्द गेला की 'काय दिवा लावला जाणार'. त्याचा गाजावाजा करण्यात आला असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. मी दिलगिरी व्यक्त केली आहे, असे स्पष्टीकरण अजित पवारांनी दिले आहे. पीएचडी करण्याबाबत विषय निवडीबाबत समिति नेमायला हवी असेही अजित पवार यांनी म्हटले आहे. या संदर्भात अधिवेशन सुरु होण्याआधी अजित पवार यांनी माध्यमांशी संवाद साधला. या वेळी अजित पवार म्हणाले की, पीएचडीबाबत माझा तोंडतून शब्द गेला काय दिवा लावला जाणार आहे. त्याचा गाजावाजा करण्यात आला आहे. त्याबाबत मी कालच दिलगिरी व्यक्त केली आहे. अनेकांनी राजकिय नेत्यांवर पीएचडी केली. पीएचडी करण्यावर दुमत नाही. पीएचडी करण्याबाबत विषय निवडीबाबत समिती नेमायला हवी. अनेक जण विविध विषयात पीएचडी करतात. जर्मन भाषेत पीएचडी केली तर अधिक फायदा होईल, असा सल्लाही अजित पवार यांनी दिला.या संदर्भात माध्यमांशी बोलताना अजित पवार म्हणाले की, पीएचडीबाबत माझा तोंडतून शब्द गेला काय दिवा लावला जाणार आहे. त्याचा गाजावाजा करण्यात आला, त्याबाबत मी दिलगिरी व्यक्त केली आहे. अनेकांनी राजकिय नेत्यांवर पीएचडी केली. पीएचडी करण्यावर दुमत नाही. पीएचडी करण्याबाबत विषय निवडीबाबत समिती नेमायला हवी. अनेक जण विविध विषयात पीएचडी करतात. जर्मन भाषेत पीएचडी केली तर अधिक फायदा होईलकांदा उत्पादक शेतकऱ्यांसह ऊस आणि दूध उत्पादक शेतकऱ्यांची ठिकठिकाणी आंदोलने सुरु आहेत. या सर्व प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी कंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेणार असल्याची अजित पवार यांनी सांगितले. १५ डिसेंबरला आम्ही अमित शहा यांची भेट घेणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. राज्यात निर्माण झालेला कांदा प्रश्न, इथेनॉल प्रश्न तसेच दूध दराचा प्रश्न याबाबत अमित शहा यांच्याशी चर्चा करण्यात येणार असल्याचेही ते म्हणाले. शुक्रवारी विधीमंडळाचे कामकाज संध्याकाळी लवकर संपले तर लगेचच आम्ही दिल्लीला जाणार असल्याची माहिती अजित पवार यांनी दिली.

## राज्यात गेल्या १० महिन्यांमध्ये २४७८ शेतकऱ्यांची आत्महत्या

**नागपूर**–गेल्या काही महिन्यांपासून राज्यातले शेतकरी सातत्याने नवनव्या आव्हानांना तोंड देत आहे. पूर, नापिकी, दुष्काळ, शेतमालाला हमीभाव न मिळणे अशा अनेक कारणांमुळे शेतकरी मेटाकुटीला आहे. दरम्यान, राज्यात शेतकरी आत्महत्यांचे प्रमाणही वाढले आहे. राज्य सरकारने विधिमंडळामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्याची कबुली दिली आहे. जानेवारी २०२३ ते ३१ ऑक्टोबर २०२३ या १० महिन्यांच्या काळात महाराष्ट्रमध्ये २४७८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. यामध्ये अमरावती विभागात सर्वाधिक शेतकरी आत्महत्येची प्रकरणे समोर आली आहेत.

कोणत्या विभागात किती आत्महत्या?

अमरावती विभागात – ९५१

छत्रपती संभाजीनगर मराठवाडा विभागात – ८७७

नाशिक विभागात – २५४,नागपूर विभागात – २५७,पुणे विभागात – २७,लातूर जिल्हा – ६४,धुळे जिल्हा – २८

अशा एकूण २४७८ शेतकरी आत्महत्येची प्रकरण राज्यभरातून समोर आली आहेत. जानेवारी ते ऑक्टोबर महिन्या दरम्यान समोर आल्याची माहिती लेखी उत्तरात राज्य सरकारकडून देण्यात आली आहे.शेतकऱ्यांना केवळ १ रूपया भरून पिक विमा योजनेचा लाभ देण्याकरिता सर्वसमावेशक पिक विमा योजना सन २०२३-२४ पासून राबविण्यास दिनांक २३ जून, २०२३ च्या कृषी विभागाच्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे. राज्य शासनाकडून प्रतिवर्ष रुपये ६००० शेतकऱ्यांना देण्यासाठी नमो शेतकरी महासन्मान निधी योजना कृषी मार्फत राबविण्यात येत आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिकांचे नुकसान झाल्यास राज्य आपत्ती व्यवस्थापन निधीतून अथवा वेळ प्रसंगी राज्य शासनाच्या निधीतून निकषाबाहेर मदत दिली जाते, अशी माहिती राज्य सरकारच्या वतीने देण्यात आली आहे.

## ओबीसी बचाव परिषद येत्या १७ डिसेंबरला चंद्रपुरात-डॉ.अशोक जीवतोडे

# महाराष्ट्रातील ओबीसी समाजातील विविध जात समुदायातील प्रतिनिधी होणार सहभागी

### मराठ्यांना स्वतंत्र आरक्षण द्या, मात्र ओबीसी आरक्षणाला धक्का लागू देवू नका

**नागपूर । प्रतिनिधी**

विदर्भवादी ओबीसी नेते डॉ. अशोक जीवतोडे यांच्या मार्गदर्शनातून महाराष्ट्रातील ओबीसी समाजातील विविध जातसमुदायाच्या प्रतिनिधींची 'ओबीसी बचाव परीषद' १७ डिसेंबरला चंद्रपूर येथील जनता महाविद्यालयाच्या पटांगणावर सकाळी ११ वाजता होणार आहे.सध्या राज्यात मराठा आरक्षण या विषयावर जे वातावरण सुरू आहे, या पार्श्वभूमीवर ओबीसी समाज पेटून उठला आहे. देशाच्या स्वातंत्र्यापासून आजतागायत घटनादत्त ओबीसी समाजाचे अधिकार व हक्क प्रलंबित आहेत. ओबीसी समाजावर होणाऱ्या अन्यायाविरोधात ओबीसी समाज व संघटना सातत्यपूर्ण लढा देत असूनही सध्या राज्यात सुरु असलेले वातावरण ओबीसी समाजाला डीवचण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यानुसार ओबिसीतील सर्व जातसमूहाने एकत्र येवून ओबीसींच्या सर्वंकष मागण्यांवर विचारमंथन करण्यात येणार आहे. याकरीता समाजातील जात संघटनांची मूठ बांधून ओबीसी संगठन आणखी मजबूत करणे, या उद्देशाने विदर्भवादी



ओबीसी नेते डॉ. अशोक जीवतोडे यांच्या सहभागातून ओबीसी समाजातील समस्त जात, उपजात समूह संघटना, ओबीसी संघटना मिळून ओबीसी बचाव परीषद च्या माध्यमातून सद्यपरिस्थितीवर मंथन करण्यात येणार आहे. त्यानुसार ओबीसी समाजातील जातसंघटनेच्या चर्चेअंती संमत होणारे ठराव राज्य सरकारला व केंद्र सरकारला हिवाळी अधिवेशन दरम्यान देण्यात येणार आहे.मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे यांची आरक्षणाबाबतची भूमिका वारंवार बदलत असताना दिसून येत आहे. सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र द्या व ओबिसीतून मराठा समाजाला आरक्षण द्या, ही त्यांची मागणी ओबीसी समाजाचे नुकसान करणारी आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळापासून तर आजतागायत मराठा समाजाला राज्यात मिळालेल्या प्रतिनिधीत्वानंतरही आत्मचिंतन करण्याचे सोडून समाजा-समाजात तेढ निर्माण करण्याचे कार्य ते करीत आहेत. त्यांचे वक्तृत्व हे द्वेष व विरोध पसरविणारे आहे. ओबीसी नेते व राज्य सरकार विरोधात ते जे बोलतात त्या मागण्या या संविधानविरोधी आहेत. जो ओबीसी समाज नेहमी मराठा समाजासोबत राहिला आहे, त्याच ओबीसी समाजाच्या पाठीत खंजर खुपसण्याचा प्रयत्न जरांगे यांचा दिसतो आहे. त्यामुळे ओबीसी समाजाला सतर्क व्हावे लागत आहे. ओबीसी समाजातील समस्त जातसमुदायाची ताकद व एकता दाखविण्याची ही वेळ आहे. त्यासाठीच 'ओबीसी बचाव परीषद' आयोजित करण्यात आलेली आहे. या परिषदेच्या माध्यमातून राज्य व केंद्र सरकारला ओबीसी समाजाच्या मागण्यांचे ठराव पाठविण्यात येईल.यानिमित्ताने ओबीसी समाजातील सर्व जातसमुदायाने एकत्र येवून आपली एकता व ताकद संपूर्ण देशाला दाखवावी, असे आवाहन विदर्भवादी ओबीसी नेते डॉ. अशोक जीवतोडे यांनी केले आहे.

## सुरज नागपुरे यांचे उपचारादरम्यान निधन



**भद्रावती :** मच्छिंद्र मच्छुआ सहकारी संस्थेचे माजी संचालक सुरज रमेश नागपुरे यांचे दि.१४ डिसेंबरला दुपारी ३ वाजता येथील खासगी रुग्णालयात हृदयविकाराने उपचारादरम्यान निधन झाले.ते झिंगुजीवार्ड येथील रहिवासी होते. मृत्यू समयी ४६ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, आई, वडील व बराच मोठा आप्तपरिवार आहे. दि.१५ डिसेंबरला दुपारी १२ वाजता मल्हारा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार.

## साठगांव येथे श्रीदत्त जयंती यात्रा

**चिमूर (प्रतिनिधी ) :-** दरवर्षीप्रमाणे यावर्षीही महानुभाव श्रीदत्तात्रेय प्रभू मंदिर साठगाव येथे बुधवार दिनांक २७ डिसेंबर २०२३ ते गुरुवार २८ डिसेंबर २०२३ पर्यंत श्रीदत्तात्रेय प्रभू जयंती यात्रा महोत्सव आयोजित केलेला असून याप्रसंगी संत महंत व मान्यवर मंडळी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. त्यानिमित्य श्रीदत्तात्रेय प्रभू जन्मोत्सव, उटी , विडा अवसर, उपहार, आरती, ध्वजारोहण, गीतापाठ , रथाशोभायात्रा, भजन, प्रवचन , किर्तन, दहीहांडी, गोपाळकाला व महाप्रसादाचे आयोजन केलेले आहे. तरी भाविक भक्त मंडळी यांनी या मंगल अवसराचा लाभ घ्यावा असे आवाहन सुरेश रामचंद्रजीपाटील गावंडे व परिवार यांनी केलेले आहे.

## युवा क्रांती संघटनेचे अध्यक्ष प्रणित पाल यांच्या मागणी ला यश

### मुल येथील कर्मवीर ग्राऊंड सौंदर्याकरण व लाईट व्यवस्था होऊन प्रकाशमय होणार

**मूल । प्रतिनिधी**

शहरातील क्रीडा प्रतिभा विकसित करण्यासाठी कर्मवीर ग्राउंड मध्ये सौंदर्याकरण लाईट व्यवस्था करणात यावी युवा क्रांती संघटने तर्फे नामदार सुधीर मुनगंटीवार यांना निवेदना मार्फत मागणी केली होती.युवा क्रांती संघटनेचे अध्यक्ष प्रणित पाल यांच्या निवेदनाची दखल घेत आढावा बैठकीमध्ये मूल येथील कर्मवीर क्रिडांगणावर प्रकाश व्यवस्था करण्याचे नगर परिषदेचे मुख्याधिकारी पवार यांनी मान्य केले, तर या मैदानावर भरत असलेले भाजी बाजार शहरातील आठवडी बाजाराचे काम पूर्णत्वास झाल्यानंतर हलविण्याचा निर्णय घेण्यात आला. मैदानावर फिरायला, व्यायाम करायला जाणाऱ्यांना वन्यप्राण्यांपासून धोका होवू नये याकरीता वनविभागाची मदत घेता येईल यावरही चर्चा करण्यात आली.

मुल येथील कॉलेज ग्राउंड मध्ये मॉर्निंग वॉक, पोलीस भरती, फॉरेस्ट भरती, कुस्ती, फुटबॉल, असे अनंत खेळ इथे खेळले जातात. परंतु पटांगणावरील लाईट व्यवस्था नसल्यामुळे तिथे खेळणाऱ्या युवा व युवती तसेच ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या अंधाराच्या सामना करावे लागतो. कॉलेजचा पटांगण हे फक्त मूल पर्यंत सिमीत नसून येथे मुल जवळील गाव खेड्यातील मुलं मुली सुद्धा पोलीस भरतीच्या प्रॅक्टिसला येतात. मुल येथील युवा युवतीच्या भविष्याचा प्रश्न असून शासन प्रशासन याकडे लक्ष देऊन सायंकाळी प्रॅक्टिस करणाऱ्या लाईट व्यवस्थेमुळे मुला मुलींना आता अडचन होणार नाही.

## १८ डिसेंबर रोजी महिला लोकशाही दिन

**चंद्रपूर :** जिल्हास्तरावर प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी महिला लोकशाही दिन तर चौथ्या सोमवारी तालुकास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. माहे, डिसेंबर महिन्याचा लोकशाही दिन सोमवार, दि. १८ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या दालनात आयोजित करण्यात येत आहे.या महिला लोकशाही दिनी न्यायप्रविष्ठ प्रकरणे, सेवाविषयक आस्थापने विषयक बाबी आणि विहित अर्जात नसलेली प्रकरणे स्विकारण्यात येणार नाहीत. तरी, ज्या महिलांचे वरील बाबी सोडून तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे असतील अशा महिलांचे अर्ज महिला लोकशाही दिनाच्या १५ दिवसापूर्वी विहित नमुण्यात असलेले अर्ज, दोन प्रतीत जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयात सादर करावेत. जेणेकरुन, जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनास तक्रार अर्जाचा निपटारा करण्यासाठी संबधित विभागाला सदर तक्रार अर्ज पाठविण्यात येईल. विहित अर्जाचा नमूना मिळविण्यासाठी कार्यालयास भेट द्यावी, असे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी कळविले आहे.

## कोल्हा ते रूढी रस्त्यावरील धन दांडग्याचे अतिक्रमण तात्काळ काढा

### शेकडो शेतकऱ्यांची मानवत तहसीलदार यांच्याकडे मागणी

**मानवत । प्रतिनिधी**

मानवत तालूक्यातील कोल्हा ते रूढी रस्त्यावरील अतिक्रमण तात्काळ काढून तो रस्ता रहदारीस शेतकऱ्यांना खूला करून देण्यात यावा अशी मागणी शेतकऱ्यांच्या वतीने मानवत तहसीलदार रणजितसिंह कोळेकर यांच्याकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

यावेळी देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे कि, मानवत तालुक्यातील कोल्हा ते रूढी हा रस्ता गेली अनेक वर्षांपासून सुरु आहे. सदरील रस्ता हा ३३ फुट रुंदीचा असून या रस्त्यावर अनेक धनदांडग्यानी अतिक्रमण केले आहे. त्यामुळे हा रस्ता रहदारीस केवळ ५ ते ६ फूट राहिला आहे. या रस्त्या लगत अनेक शेतकऱ्यांची शेती असून शेती कामासाठी लागणारे वाहने व बैलगाडी नेण्यासाठी मोठी अडचण निर्माण झाली आहे. त्या मुळे या रस्त्यावरील अतिक्रमण तात्काळ काढण्यात यावे व रस्ता



रहदारीस १५ दिवसाचे आत मोकळा करावा अन्यथा लोकशाही मार्गाने उपोषण करण्यात येईल असा ईशारा एका निवेदनाद्वारे दिला असून निवेदनावर प्रा. डॉ. रामचंद्र भिसे पाटील , सुरेशराव भिसे पाटील , दत्ता भिसे पाटील, अर्जुन ढाकरगे, गजानन संसारे, शेख रसूल, दिलीप भिसे, प्रकाश संसारे, दिपक भिसे, दिनेश भिसे, रामभाऊ भिसे, सचिन भिसे, रामेश्वर भिसे, सिद्धेश्वर भिसे, गजानन भिसे, विठ्ठल भिसे, अनुराग भिसे, छगन तारे, आश्रोबा लोणकर, सुरेश भिसे, केशव भिसे, गोविंद पौळ, नारायण भिसे, बालासाहेब भिसे, सखाराम भिसे, सुनील बोराडे, रामराव देशमुख,अशोक संसारे, सिद्धेश्वर ढाकरगे, गोपाळ ढाकरगे, अर्जुन हारकळ, अर्जुन ढाकरगे, जगन भिसे, गणेश ढाकरगे, गजानन भिसे, राहुल देशमुख यांच्या सह या भागातील त्रस्त शेतकऱ्याच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## भाजपा वाहतूक सेलच्या मराठवाडा विभाग संपर्क संपर्कप्रमुख पदी सखाराम कुलकर्णी

**मुंबई । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष वाहतूक सेल व भाजपा प्रणित नवभारतीय शिव वाहतूक संघटनेच्या मराठवाडा विभाग संपर्कप्रमुख पदी श्रेष्ठ नागरिक तथा सामाजिक कार्यकर्ते सखाराम कुलकर्णी यांची नियुक्ती राष्ट्रीय अध्यक्ष हाजी अरफात शेख यांनी करून नुकतेच दिनांक १२ डिसेंबर रोजी त्यांना नियुक्तीचे पत्र दिले.भारतीय जनता पक्षाने ट्रक, ऑटो, टेम्पो ,स्कूल बस, रिक्षा यांचे वर होत असलेल्या अन्यायाविरुद्ध, त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्यामुळे तसेच प्रादेशिक परिवहन, पोलीस यांच्याकडून विनाकारण अडवणूक करून दंड लावणे पैसे वसुली या प्रकारावर वचक, आळा बसण्यासाठी भाजपा वाहतूक सेलची स्थापना केली आहे .याचे राष्ट्रीय अध्यक्ष हाजी अरफात शेख, सरचिटणीस निलेश निम्हण व कार्याध्यक्ष प्रवीण आखाडे असून आमदार आशिष शेलार हे प्रभारी आहेत.



वाहतूकदारांना समाजामध्ये सन्मान मिळवून देणे या समाजाच्या अडचणी दूर करणे यांची काळजी घेणे हे या सेलचे कार्य आहे. सखाराम कुलकर्णी यांचे सामाजिक कार्य व संघटन कौशल्य याचा विचार करून या भाजपा वाहतूक सेलच्या मराठवाडा विभाग संपर्कप्रमुख पदी यांची नियुक्ती करून नियुक्तीचे पत्र दिनांक १२ डिसेंबर रोजी अध्यक्ष हाजी अरफात शेख यांनी सखाराम कुलकर्णी यांना दिले. व संघटना वाढीस तसेच पुढील कार्यास त्यांना शुभेच्छा दिल्या.सामाजिक कार्याची आवड असून कुलकर्णी राष्ट्रवादी ग्राहक संरक्षण संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष आहेत. या नियुक्तीमुळे सखाराम कुलकर्णी यांचे सर्वत्र अभिनंदन होऊन यांचेवर त्यांचे मित्रपरिवार, नातेवाईक यांचे कडून शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

## भाजपसोबत जाण्याच्या ३ पत्रावर रोहित पवारांच्या सह्या:आमदार सुनील शेळके

**नागपूर-**रोहित पवारांनी भाजपसोबत सत्तेत सहभागी होण्याच्या पत्रावर तीन वेळा सह्या केल्या असल्याचा गौप्यस्फोट आमदार सुनील शेळके यांनी केला. सुनील शेळके यांनी त्यासंबंधित तीन तारखाही जाहीर केल्या. २२ जून, २ जून आणि त्याच दिवशी म्हणजे २ जुलै रोजी अशा तीन पत्रांवर रोहित पवारांनी सह्या केल्याचा दावा आमदार सुनील शेळके यांनी केला आहे.दरम्यान सुनील शेळके पुढे बोलताना म्हणाले की, राज्यात स्वयंघोषित संघर्ष योद्धा म्हणून ज्यांनी यात्रा काढली त्यांना अजित पवार यांच्यावर बोलायचं अधिकार नाही. कारण अजित पवार यांनी इतरांच्या मतदारसंघापेक्षा रोहित पवार यांच्या मतदारसंघात सर्वात जास्त निधी दिला आहे. ते स्वःच्या काकाचे होऊ शकले नाहीत ते आमचे नेते कसे काय होतील? पक्ष कसा काय सांभाळतील?, असा सवाल उपस्थित केला आहे.सुनील शेळके म्हणाले की, अजित पवार यांनी दुसरी पिढी निर्माण केली नाही असे ते म्हणतात मग सुनिल शेळके, नीलेश लंके, राज नवघरे या सर्व सामान्य लोकांना संधी कुणी दिली? जितेंद्र आव्हाड यांनी स्वतःला सोडून दुसऱ्याला कुणाला निवडून आणले हे जाहीर करावे. पहाटेचा शपथविधी, महाविकास आघाडीतून बाहेर जाऊन भाजप सोबत जाणे आणि आता महायुती मध्ये सहभागी होणे हे सर्व निर्णय सर्वानुमते होती.२२ जून २०२२- भाजप सोबत गेले पाहिजे, अजित पवार जे म्हणतील त्याला आपला पाठिंबा असेल आणि एक पत्र तयार करण्यात आले. ज्यामध्ये भाजप सोबत जाण्याचा निर्णय घेण्यात आला. ४७ आमदार त्यावेळी उपस्थित होते. या पत्रात माझ्या आधी रोहित पवार यांनी सही केली होती. या पत्रावेळी अजित पवार यांनी सांगितले की भाजप सोबत आपल्याला जायचे नाही. त्यांनी नकार दिला.२ जुलै २०२२- विरोधी पक्षनेते करा यासाठी समर्थन, माणिकराव कोकाटे यांच्या अध्यक्षतेखाली- वाय बी चव्हाण सेंटर येथे बोलण्यात आली होती. नाशिकचे आमदार माणिकराव कोकाटे यांनी पुढाकार घेतला आणि अजित पवार यांना विरोधी पक्षनेते करण्याचा निर्णय घेण्यात आला. यावर ३२ आमदारांनी सह्या केल्या होत्या. सत्तेत जायचे ठरले होते त्यावेळी ५२ आमदार यांनी सह्या केल्या होत्या.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .